
## डॉ.हरिश्चंद्र महाजन यांची भडगाव तालुका राष्ट्रवादी ओबीसी सेल अध्यक्षपदी निवड

**गुढे, ता.भडगाव । वार्ताहर**



येथील ग्रामपंचायत सदस्य डॉ हरीशचंद्र उत्तमराव महाजन यांची नुकतीच भडगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ओबीसी सेल तालुकाध्यक्षपदी निवड झाली असल्याचे पत्र प्राप्त झाले असून त्यांच्या निवडीचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे ते येथील माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ उत्तमराव महाजन व गुढे गावाच्या प्रथम महिला लोकनियुक्त सरपंच कल्पना उत्तमराव महाजन यांचे लहान चिरंजीव आहेत.

## पारोळ्याचे जितेंद्र वानखेडे यांची निवड

**पारोळा । प्रतिनिधी**



ऑल इंडिया पँथर सेनेच्या जळगाव जिल्हा (पश्चिम) अध्यक्षपदी पारोळा येथील जितेंद्र वानखेडे यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांच्या आदेशाने धुळे जिल्हाध्यक्ष सागर मोहिते यांनी ही निवड केली. याप्रसंगी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या निवडीबाबत जितेंद्र वानखेडे यांचा सत्कार करण्यात आला.



## डॉक्टर हे पृथ्वीवरील देवदूत-एन.जी.शेजोळे

**मुक्ताईनगर । प्रतिनिधी**

डॉक्टर लोकांना जीवदान देतात त्यामुळे ते पृथ्वीवरील देवदूत आहेत असे प्रतिपादन जे.डी.सी.सी.बँकेचे व्यवस्थापक एन.जी.शेजोळे यांनी मुक्ताईनगर येथे आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमात डॉक्टरांचा सत्कार करताना केले.

याप्रसंगी श्री.शेजोळे म्हणाले की, माणसाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेणारे डॉक्टर म्हणजे मानवाचे सुरक्षा कवच असल्याचे प्रतिपादन एन जी शेजोळे यांनी आपल्ये मनोगत व्यक्त करताना केले तसेच पत्रकार मोहन मेढे यांनी मुक्ताईनगरचे डॉक्टर सामाजिक बांधिलकी जोपासत रुग्णांना माफक दरासेवा देतात यावेळी डॉ.प्रवीण पाचपांडे डॉ.प्रवीण बोदडे डॉ.हर्षल पाटील डॉ.नरवेलकर यांचा त्यांचे हॉस्पिटलमध्ये जाऊन सत्कार केला त्यावेळी भुसावल पोस्ट ऑफिसचे पोस्ट मास्टर आकाश शेजोळे आणि हॉस्पिटलमध्ये कर्मचारी उपस्थित होते तसेच श्री.शेजोळे यांनी सन्माननीय डॉ.डी एस पाटील भुसावल डॉ.योगेश राणे डॉ.मराठे डॉ.जगदीश पाटील डॉ.संदीप तायडे डॉ.तुषार पाटील डॉ.संदीप कांडेलकर डॉ.सुनील उदे डॉ.गजेंद्र पाटील डॉ.विजय पाटील डॉ.कुणाल विनायक पाटील डॉ.रत्नानी भुसावल यांना फोनवरून शुभेच्छा दिल्या.

## बलवाडी विद्यालयात पालक-शिक्षक संघाची सभा

**निंभोरा बु., ता.रावेर । वार्ताहर**




बलवाडी परिसर शिक्षण प्रसारक मंडळ बलवाडी संचलित श्री बाजीराव नाना पाटील टेक्निकल माध्यमिक विद्यालयात पालक शिक्षक संघाची सहविचार सभा मुख्याध्यापक एन व्ही पाटील यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाली. प्रास्ताविक भगवानदास पाटील सर यांनी करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. सभेत नवीन शैक्षणिक धोरण, विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शिष्यवृत्ती, इयत्ता दहावीचा निकाल, अभ्यासक्रम व नियोजन, विद्यार्थी गुणवत्ता यासह नवनवीन शासन निर्णयावर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थी व शाळा यांच्या अडीअडचणीवर चर्चा करण्यात आली. पालक शिक्षक संघाची स्थापना यावेळी करण्यात आली. अध्यक्षपदी एन व्ही पाटील, उपाध्यक्ष- जितेंद्र महाजन, सचिव राहुल येवले, सहसचिव निलेश पाटील, पालक सदस्य- सुभाष इंगळे, काशिनाथ आटवाडेकर, जितेंद्र तायडे, बळीराम सपकाळे तसेच महिला प्रतिनिधी सौ.वैशाली पाटील, सौ.दुर्गा महाजन, सौ.रंजना पाटील यांची निवड करण्यात आली. ग्रामसेवक नितीन महाजन उपस्थित होते. आभार राहुल येवले यांनी मानले. संचलन विजय चौधरी यांनी केले. सौ.रिता चौधरी, सौ.तेजल महाजन, सौ.तेजल पाटील, सौ.रोशनी पाटील, सुदेश पाटील, अक्षय चौधरी, श्रीमती विजया भंगाळे यासह शिक्षकेतर कर्मचारी बंडु तायडे, गोपाल पाटील, सुनील पाटील, राजेंद्र चौधरी यांनी परिश्रम घेतले.

## अमळगाव येथे पत्ते खेळताना ५ जणांना पकडले

**अमळनेर । प्रतिनिधी**

तालुक्यातील अमळगाव येथे निंबाच्या झाडाखाली पत्ते खेळणाऱ्या ५ जणांवर मारवड पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. मारवड पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून सपोनि जिभाऊ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पोउनी संजय पाटील, सफौ फिरोज बागवान, पोना मिलिंद बोरसे, पोकॉ.उज्वल पाटील यांनी अमळगाव येथे निंबाच्या झाडाखाली पत्ते खेळत असणाऱ्या लोकांवर धाड टाकली यात किसन पारधी, प्रवीण पारधी, कैलास पाटील, संजय भोई, कैलास वडर सर्व रा.अमळगाव हे पत्ते खेळतांना सापडले त्यांच्या जवळील रोख ५ हजार ५०० रुपये जप्त करण्यात आले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पो हे कॉ संजय पाटील करत आहेत.

## ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

**अमळनेर । प्रतिनिधी**

तालुक्यातील मारवड रस्त्यावरील धानोरा फाट्याजवळ दुचाकीला भरधाव ट्रकने धडक दिल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना २९ रोजी रात्री घडली आहे.

कळमसरे येथील रहिवासी संतोष ओंकार माळी (वय ४८) हे २९ रोजी रात्री ८ वाजता अमळनेर येथून दुचाकीने परतत असताना धानोरा फाट्याजवळ समोरून येणाऱ्या ट्रक क्रमांक एमएच १४ एचयू ८४११ वरील चालकाने भरधाव वेगाने ठोस दिल्याने संतोष माळी हे जखमी होऊन खाली पडले. जमलेल्या लोकांनी त्यांना उचलून सरकारी दवाखान्यात दाखल केले. डॉक्टरांच्या सल्ल्याने त्यांना धुळे येथे खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून उजव्या पायाला फ्रॅक्चर झाले असून उजव्या हाताच्या पंजा आणि बोटांना दुखापत झाली असून दुचाकीचे नुकसान झाल्याने ट्रक चालकाविरुद्ध मारवड पोलिसांत फिर्याद देण्यात आली असून पुढील तपास हेकॉ प्रवीण पारधी हे करीत आहेत.

# अमळनेर-धुळे रस्त्यावर एस.टी.बसची डंपरला धडक

### चालकासह एक प्रवासी जखमी

**अमळनेर । प्रतिनिधी**




भरधाव जाणाऱ्या एसटीने डपंरला मागाहून धडक दिल्याने बसचालक व एक प्रवासी जखमी झाल्याची घटना दि.३ रोजी सकाळी साडे सात वाजेच्या सुमारास अमळनेर धुळे रस्त्यावर घडली.

गोरख भगवान पाटील हा डपंर क्रमांक एम एच ५४ ,३५९ डिझेल भरण्यासाठी धुळे रोडला जात असताना त्याने आर के नगर जवळ गतिरोधक आल्याने वाहन हळू केले. त्याचवेळी अमळनेर पुणे बस क्रमांक एम एच १४ एम एच २६८७ ने डपंरला मागाहून धडक दिली. धडक जोरात बसल्याने एस टी चालकाचे पाय केबिन मध्ये अडकले. तर एका प्रवाश्याच्या डोक्याला मार लागला. आजूबाजूला लोकांची गर्दी होती. लोकांनी सुमारे पाऊण तासानंतर चालकाचे पाय बाहेर काढले. १०८ रुग्णवाहिकेने त्यांना पुढील उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले. गोरख भगवान पाटील याने अमळनेर पोलिसस्टेशनला फिर्याद दिल्यावरून बस चालक मनोहर दत्तात्रय पाटील यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान ही बस नवी असून याची मला सवय नसल्याने मला नवी बस देऊ नका असे चालक मनोहर पाटील यांनी सांगितले होते. परंतु त्याच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. चालक उशिरा आगारात आले त्यामुळे बसला देखील उशिर झाला. दरम्यान अमळनेर आगाराला नुकत्याच पाच नवीन बसेस प्राप्त झाल्या असून त्यातील दोन बसेसचा अपघात झाला आहे. चालकांना नवीन बसची सवय नसल्याने त्यांनी नवीन बस न्यायला नकार दिला होता. याबाबत आगार प्रमुखांना प्रतिक्रिया विचारण्यासाठी भ्रमणध्वनी लावला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.



## मोरगाव खुर्द जि.प.शाळेला जि.प.सीईओ यांची भेट

**मोरगाव । वार्ताहर**

मोरगाव खुर्द (ता.रावेर) येथील जि.प. शाळेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी गुरुवारी भेट देऊन गावकऱ्यांशी संवाद साधला.

या ठिकाणी शाळेच्या भौतिक सुविधा पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांशी हितगुज केला, शाळेतील उपक्रम पाहून समाधान व्यक्त केले. याप्रसंगी जि.प.माजी अध्यक्षा रंजना पाटील, प्रल्हाद पाटील, सरपंच जे.आर.पाटील, गटविकास अधिकारी विनोद मेढे, के.पी.वानखेडे, विस्तार अधिकारी प्रवीण शिंदे, उमेश पाटणकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मुकेश पाटील, हिरामण पाटील, सर्व ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर, पंचायत समिती अधिकारी वर्ग, केंद्रप्रमुख प्रकाश महाजन सोबत सहाय्यक शिक्षक युवराज महाकाळ, संदीप वसावे व सरला घोलाणे व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. करनवाल यांनी शालेय गुणवत्ता व भौतिक सुविधा पाहून समाधान व्यक्त केले. तसेच जिल्हा शिक्षक पुरस्कार सन २०२४ व मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा क्रमांक २ जि.प.शाळा मोरगाव खुर्दला मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्याकडून वह्या वाटप करण्यात आल्या.

## पारोळा सामाजिक वनीकरणतर्फे ‘एक पेड माँ कें नाम’ उपक्रम

**पारोळा । प्रतिनिधी**



ज्ञानदीप बहुउद्देशीय विद्या प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालय सार्वे बाभळें शाळेत सामाजिक वनीकरण विभाग जळगाव परिक्षेत्र पारोळा यांच्या मार्गदर्शनाने एक पेड के मॉ नाम उपक्रम आयोजित करण्यात आला दिनांक ५ जून जागतिक पर्यावरण दिनाच्या औचित्य साधून हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात वृक्ष पूजनाने करण्यात आली त्यानंतर सामाजिक वनीकरण पारोळा परिक्षेत्र वनपाल संजय पाटील , वनरक्षक दिपक पाटील, वनरक्षक पूनम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आला. त्यानंतर वनपाला संजय पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यांनी सांगितले की सामाजिक वन विभाग जळगाव परिक्षेत्र पारोळा यांच्या माध्यमातून एक पेड मॉ के नाम उपक्रम साजरा करण्यात येणार आहे त्या माध्यमातून जिल्ह्यातील शाळा, कार्यालय, ग्रामपंचायत, शासकीय कार्यालय इत्यादी ठिकाणी पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब याचा संकल्पपनेतून आईच नावाने वृक्षारोपण करून वृक्ष ही आपली आई आहे. ज्याप्रमाणे आपण आईला जीव लावतो तसेच वृक्षाला जीव लावणे गरजेचे आहे आणि आपण बघितलंच की गेल्या उन्हाळ्यात उन्हाचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात वाढले होते ४५ अंश ते ४८ अंश पर्यंत तापमान वाढ झाली.

त्यासाठी विद्यार्थ्यांनी,पालकांनी वृक्षारोपण करणे व लावलेले वृक्ष जगवणे हे काळाची गरज आहे त्यासाठी सर्वांनी स्वयंप्रेरणेने आपल्या घराजवळ, गावाजवळ, शाळेजवळ, शेतात जिथे जिथे आपल्याला शक्य होईल तिथे जास्तीत जास्त वृक्षारोपण करणे गरजेचे आहे आणि लावलेले वृक्ष जगवणे ही फार मोठी जबाबदारी तुम्हा आम्हा सर्वांना वर आहे त्यासाठी शासना अंतर्गत विद्यार्थी आणि पालक मध्ये एक पेड मॉ के नाम भावना रुजवणे गरजेचे आहे असे मार्गदर्शन संजय पाटील यांनी केले. तसेच ज्ञानदीप संस्थेचे अध्यक्ष भैय्यासाहेब पवार यांनी सामाजिक वनीकरण विभाग पारोळा याचे आभार मानले की त्यांनी शाळेला मोफत वृक्ष दिलं.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर पी साळुंखे तर कार्यक्रमाचे यशस्वी साठी शाळेचे मुख्याध्यापक दीपक मुरलीधर पाटील शिक्षक सचिन पाटील, बी एस निकुंभ, के एस सोनवणे, एच एच पाटील, एम ए पाटील, डी एस पाटील, निलेश पाटील, उमाकांत बाविस्कर, सुनील पाटील आदींनी परिश्रम घेतले.

## खंडित वीजपुरवठ्याने पाण्यासाठी वणवण; महावितरण विरोधात संताप

**धरणगाव । प्रतिनिधी**

शहरालगतच्या मोठा माळीवाडा परिसरातील जीवन बाबा मंदिरावर असलेला एक विद्युत खांब गेल्या दोन महिन्यांपासून पडलेला असल्याने शेतकऱ्यांमध्ये महावितरणविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. अनेकवेळा तक्रारी करूनही कर्मचारी आणि अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

या विद्युत खांबावरून तीन कनेक्शन जोडलेली होती. संबंधित कर्मचाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी इतर दोन कनेक्शन धारकांकडून पैसे घेऊन त्यांची जोडणी करून दिली, मात्र शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याचे समोर आले आहे. पीडित शेतकऱ्याने सांगितले की, त्यांनी संबंधित वायरमनला पाच-सहा वेळा फोन केले, तसेच कार्यालयात जाऊन राजेंद्र पाटील यांच्याकडे दोनदा तक्रार दिली. कार्यकारी अभियंता सोनगिरे साहेब यांच्याकडेही एकदा तक्रार देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही किंवा जोडणी झालेली नाही. हा भाग गावाजवळ असल्याने अनेक नागरिक पाणी भरण्यासाठी येत असतात. परंतु विद्युत कनेक्शन नसल्यामुळे पाण्याची मोठी गैरसोय होत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या जनावरांनाही पाण्यासाठी दूरपर्यंत जावे लागत आहे. शेतकऱ्यांनी आता प्रश्न विचारला आहे की, महावितरणचे कर्मचारी आणि अधिकारी आता तरी या गंभीर समस्येकडे लक्ष देणार का? या प्रकरणी तातडीने लक्ष घालून पडलेला विद्युत खांब दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## आपले कौशल्य ओळखून करिअर निवडा-प्रा.राजेंद्र चिंचोले

**पाचोरा । प्रतिनिधी**

येथील शिंदे इंटरनॅशनल स्कूल पाचोरा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच संपन्न झाला. शाळेच्या सभागृहात गिरणाई संस्थेचे चेअरमन तात्यासाहेब पंडित शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक प्रा.राजेंद्र चिंचोले, संचालक ॲड.जे.डी.काटकर, प्राचार्य डॉ.विजय पाटील, अरुण पाटील उपस्थित होते.

या कार्यक्रमात बोलताना प्रा.राजेंद्र चिंचोले यांनी विद्यार्थ्यांनी आपली आवड, क्षमता, मर्यादा प्राविण्य, कौशल्य, ओळखून व विविध पर्यायांची माहिती घेऊन करिअर निवडावे असे स्पष्ट करत नीट परीक्षेबद्दल सखोल मार्गदर्शन केले. इंजिनिअरिंग व मेडिकल याव्यतिरिक्त करिअरच्या असंख्य शाखांची माहिती देऊन या शाखांचा देखील विद्यार्थ्यांनी करिअर निवडताना विचार करावा अशा प्रकारचे मार्गदर्शन प्रा. राजेंद्र चिंचोले यांनी केले. विद्यार्थ्यांनी आपले करिअर गुणांवर न ठरवता आपल्यातील क्षमता ओळखून करिअर ठरवावे त्याचवेळी जिद्द चिकाटी आणि समर्पण या त्रिसूत्रीच्या माध्यमातून विद्यार्थी जीवनात आपले ध्येय गाठू शकतो असे मार्गदर्शनही त्यांनी केले.

ॲड.जे.डी.काटकर यांनी विद्यार्थ्यांनी भविष्यात आपल्याला काय व्हायचे आहे? हे ध्येय निश्चित करावे व त्याच्या प्राप्तीसाठी अथक परिश्रम करून यशस्वी व्हावे अशा शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ.विजय पाटील यांनी विद्यार्थ्यांमध्ये महत्वाकांक्षा असेल प्रतिकूल परिस्थितीतही ध्येय प्राप्ती करून यशस्वी होता येते अशा आशयाचे प्रतिपादन केले. पालकांच्या वतीने अरुण पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिंदे इंटरनॅशनल स्कूलच्या शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.




## जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी करनवाल यांची रावेरला भेट

**रावेर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या सिईओ मीनल करनवाल ह्या मोरगांव खुर्द (ता.रावेर) येथील बालस्नेही पंचायत या व्हाटसअप्प ग्रुपशी जोडलेल्या असल्याने त्यानी मुलीचे उपक्रम पाहून थेट गावात जाऊन या उपक्रमात सहभागी मुलींशी संवाद साधत त्यांच्या उपक्रमांचे कौतूक केले. सीईओ येणार असल्याने बुधवार पासूनच रावेर पंचायत समितीत साफसफाई सुरु होती. गुरुवारी त्यांनी भेट देत रावेर तालुक्यातील घरकुल योजना, कचरा संकलन, सशक्तीकरण अभियान, एमआरजीएस यावर आढावा घेतला. तर रावेर पंचायत समितीत बायोमॅट्रीक हजेरी घेतली जाणार असल्याचे देखील सांगितले आहे.

मोरगाव खुर्द (ता.रावेर) येथे जाऊन बालिका स्नेही पंचायतीच्या सहभाही युवतींशी सीईओ करनवाल संवाद साधला. उपक्रमांबद्दल माहिती घेत मार्गदर्शन केले. ग्रामपंचायत सरपंच व सदस्य यांच्याकडून विकास कामांची माहिती घेतली व बालिका स्नेही पंचायत उपक्रमाला सहकार्य करण्याच्या सूचना सुधा दिल्या आहे.गावातील खुल्या व्यायाम शाळेची पाहणी केली.वृक्षारोपण, गावातील विकास कामांची व भूमिगत गटार योजनेची पाहणी करत कामाचे कौतुक केले. जलयुक्त शिवार अभियानात केलेल्या कामाचा झालेला किती फायदा झाला याची माहिती सरपंच जे आर पाटील यांनी दिली. दीर्घकाळ झालेल्या चर्चेत पर्यावरण याबाब माहिती घेतली.

जिल्हा परिषद शाळेला भेट देवून शिक्षक व विद्यार्थ्यांशी हितगुज साधला.गावातील उद्योजक आर.एस.पाटील यांच्या निधीतून शाळेत बसवलेल्या आर.ओ.फिल्टर बाबत माहिती देण्यात आली. यावेळी माजी जिप अध्यक्षा रंजना पाटील, प्रल्हाद पाटील, गटविकास अधिकारी विनोद मेढे, खेमचंद वानखेडे, विस्तार अधिकारी प्रवीण शिंदे, उमेश पाटणकर, सरपंच जे.आर.पाटील, ग्रा. पांचयत सदस्य उषा पाटील, पूनम पाटील, नंदा महाजन, अनुसया पाटील, भारती पाटील, जितेंद्र लहासे, रवींद्र पाटील, माजी मुख्याध्यपक एस.डी.पाटील, आत्माराम पाटील, कैलास पाटील, अजाबराव पाटील, प्रवीण महाजन, ग्रामसेवक सतीश भालेराव ग्रामपंचायत कर्मचारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका व मदतनीस, गट प्रवर्तक व बालिका स्नेही पंचायत चे सर्व सदस्य उपस्थित होते. दरम्यान त्यांच्या दौऱ्यात घन कचरा व्यवस्थापन याबाबत माहिती घेतली. बचत गट यांना बैठक हॉल देण्याबाबत देखील पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

घरकुल योजना लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी येणाऱ्या अडचणींवर मार्गदर्शन केले. कार्यालयात बायोमॅट्रीक हजेरी घेतली जाणार असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

## यावल महाविद्यालयाच्या कॉलेज कमिटी चेअरमनपदी प्रा.मुकेश येवले यांची नियुक्ती

**यावल । प्रतिनिधी**



जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादीत , जळगाव या शैक्षणिक संस्थेच्या नुकत्याच पार पडलेल्या कार्यकारी संचालक मंडळाच्या बैठकीत एकमताने दि.१ जुलै२०२५ पासुन संस्था संचलीत कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यावल ता यावल जि जळगाव या महाविद्यालयाच्या कॉलेज कमेटीवर चेअरमन पदावर नियुक्ती करण्यात आली असे पत्र जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळ जळगाव यांचे मानद सचिव निलेश रणजित भोईटे यांनी दिले आहे.

प्रा.मुकेश पोपटराव येवले हे त्याच कला वाणिज व विज्ञान महाविद्यालय यावल येथील शैक्षणिक संस्थे मध्ये प्रधिर्घ ३२ वर्ष सेवा देत असतांना दि.३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त होत असतांनाच त्यांच्या सेवापुर्ती कार्यक्रमात बोलताना जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाचे व्हा चेअरमण विरेंद्र भोईटे व महाविद्यालयाचे माजी चेअरमन तथा माजी आ.रमेश विठ्ठल चौधरी संख्येचे अध्यक्ष गोकुळनाना पाटील जेष्ठ संचालक जयवंतराव येवले, संचालक परमानंद साठे, तज्ञ संचालक महेंद भोईटे, उमाकांत पाटील सुनिल भोईटे यांनी प्रा मुकेश येवले यांना नियुक्ती पत्र दिले. याच कार्यक्रमास माजी आ.रमेश चौधरी प्रभाकर सोनवणे, भगतसिंग पाटील, डॉ कुंदण फेगडे प्राचार्य डॉ संध्या सोनवणे नुतन मराठा महाविद्यालय जळगाव प्राचार्य डॉ एल पी देशमुख वरणगाव येथील प्राचार्य विजय पवार डी पी साळुंके, अनिल साठे ग स सोसायटी संचालक राम पवार व मंगेश भोईटे माजी प्राचार्य एफ एन महाजन फैजपुरचे मा प्राचार्य डॉ जी पी पाटील कॉंग्रेस कमेटी ता अध्यक्ष शेखर पाटील , माजी नगराध्यक्ष दीपक बेहडे माजी नगराध्यक्ष पिंटू राणे, नगराध्यक्ष रोकेश कोलते माजी उप प्राचार्य सुरेश कदम, प्रा.ॉ एम डी खैरणार उपप्राचार्य प्रा अशोक काटकर, मा उप प्राचार्य प्रा अर्जून पाटील, विजय पाटील, एम बी तडवी, बोदडे नाना अबदुल सईद मुख्यध्यापक एम के पाटील मा मुख्याध्यापक प्रा किरण दुसाने प्रा बिरपणकर उर्दु मुख्यध्यापक अय्युब जनाब प्रा.अय्युब खान, डॉ.हेमंत येवले, अमोल दुसाने, अनिल कदम, प्रा.अजय भोईटे, अनिल इंगळे,प्रमोद काळे, जगदीश शिंदे, प्रा.संजय पाटील, वसंत पाटील, नितिन देशपांडे सकाळी सरपंच दिपक पाटील, सुभाष महाजन जितु महाजन, मुन्ना पाटील, नारायण चौधरी, उमेश फेगडे देविदास नाना पाटील, उजैसिंह राजपूत, पी एस सोनवणे वसंत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## विवाहितेचा छळ; पतीसह सासरच्या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**पाचोरा । प्रतनिधी**

पतीने नवविवाहितेसोबत शारिरीक संबंध प्रस्थापित केल्याचे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत विवाहितेस सिगारेटचे चटके देत शारिरीक व मानसिक छळ सुरू होता. असह्य होणारा त्रास सहन न होता असल्याने अखेर विवाहितेने पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये पतीसह सासरच्या तीन जणांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

याबाबत पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार कल्याणी हिचा विवाह दिपक कैलास शिंपी रा.जारगाव, ता.पाचोरा ह. मु. रामानंदनगर, पाचोरा याचेशी २६ मे २०२५ रोजी नाशिक येथे झाला होता. लग्नानंतर काही दिवस चांगली वागणूक मिळाल्यानंतर दिपक शिंपी याने कल्याणी हिचा शारिरीक व मानसिक छळ सुरू केला. तसेच शारिरीक संबंध प्रस्थापित केल्याचे व्हिडिओ काढुन ते व्हायरल करण्याची धमकी देत कल्याणी हिच्या शरीरावर सिगारेटचे चटके देत मारहाण सुरू केली.

कल्याणी हिने सदरचा प्रकार सासु संगिता कांतीलाल पाटील यांना सांगितला असता संगिता पाटील व सासरे कांतीलाल शिवाजी पाटील यांनी कल्याणी चे काही एक म्हणनं ऐकुन घेतले नाही. या उलट संगिता पाटील व कांतीलाल पाटील यांनी देखील कल्याणीचा गांजपाठ सुरू केला. सततच्या होणाऱ्या त्रासाला कंटाळून अखेर कल्याणी हिने पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये दिपक कैलास शिंपी (पती), कांतीलाल शिवाजी पाटील (सासरे), संगिता कांतीलाल पाटील (सासु) सर्व रा. रामानंद नगर, पाचोरा यांचे विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक अशोक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पो. कॉ. दिलीप वाघमोडे हे करीत आहे.